**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, अर्थसंकल्पावरील माननीय अर्थमंत्र्यांच्या उत्तराच्या भाषणानंतर अशा प्रकारे प्रश्नोत्तरे होत नाहीत. आज ३१ मार्च आहे. आपल्या या मागण्या मान्य करण्यासाठी मंत्रिमंडळाची बैठक घ्यावी लागेल. लेखाअनुदान विधेयक या सभागृहात मंजूर झाल्यानंतर विधान परिषदेत जाऊन तेथे ते मंजूर व्हावे लागते. त्यामुळे हे विधेयक जेवढे लवकर मंजूर करता येईल तेवढ्या लवकर मंजूर करणे आवश्यक आहे. त्यामुळे सन्माननीय गटनेते श्री. सुभाष देसाई यांच्यानंतर मी आता कोणालाही या विषयावर बोलण्याची परवानगी देणार नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभागृहाचे चर्चेचे दोन दिवस वाया घालविले नसते तर आज ही वेळ आपल्यावर आली नसती.

**श्री. सुभाष देसाई :** अध्यक्ष महोदय, आर्थिक शिस्तीचा उल्लेख माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी केला आहे. पण निधीच्या समान वाटपाबाबत समाधानकारक उत्तर सभागृहाला मिळाले नाही. महसूल वाढीबद्दलच्या सूचना स्वीकारण्याचे त्यांनी मान्य केले आहे.

अध्यक्ष महोदय, आणखी एक मुद्दा असा आहे की, विक्रीकर घोटाळ्याबाबत ज्या काही सूचना करण्यात आल्या त्यापैकी सायबर क्राईम अन्वेषण एजन्सीकडून चौकशी करण्याचे माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी मान्य केले आहे. अधिसूचना बोगस आहे, हे देखील त्यांनी मान्य केले आहे. परंतु, महसुलाची हानी झाली नाही, हे त्यांचे विधान थोडेसे वेगळे आहे. महसुलाची हानी झालेलीच आहे. एकट्या पुण्याच्या विक्रीकर उपायुक्तांनी ८०२ कोटी रुपयांची वसुली करण्याचे काम सुरू करण्यास परवानगी मागितली आहे. याचाच अर्थ, अधिसूचनेचा गैरफायदा घेतला गेला आहे. म्हणून आमची मागणी आहे की, सीबीआयकडून या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी. त्यामधून जे सत्य आहे ते सगळ्यांसमोर येईल.

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, उठसूठ कोणत्याही गोष्टीसाठी सीबीआय चौकशीची मागणी करणे, बरोबर होणार नाही. यामधील वस्तुस्थिती पुढे येत नाही, असे लक्षात आले तर वेगळा विचार करता येईल.

**अध्यक्ष :** आता अर्थसंकल्पावरील शेवटच्या दिवसाची सर्वसाधारण चर्चा समाप्त झाली आहे.

---

## वित्त मंत्री यांचा सन २०११-२०१२ चा लेखानुदानावरील प्रस्ताव

**श्री. अजित पवार** (उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री) : अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र विधानसभा नियम २६२ अन्वये सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षाच्या भागाच्या अंदाजित खर्चासाठी लेखाअनुदानाचा खालील प्रस्ताव या सभागृहासमोर सादर करीत आहे.

"सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षाच्या भागाच्या अंदाजित खर्चासाठी अनुसूचित दर्शविलेल्या शीर्षाप्रमाणे व मागण्यांप्रमाणे रुपये २३,३७९ कोटी ५५ लक्ष ५० हजार यापेक्षा अधिक होणार नाही इतकी रक्कम राज्यपालांना आगाऊ मंजूर करण्यात यावी."

हा प्रस्ताव विचारात घेण्यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०६ सह-अनुच्छेद २०३ चा खंड (३) अन्वये राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी या सन्माननीय सभागृहास शिफारस केली आहे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---

## कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

**डॉ. नितीन राऊत** (रोजगार व स्वयंरोजगार मंत्री) **:** अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २००७-२००८ व २००८-२००९ या वर्षाचा अनुक्रमे दहावा व अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष :** दहावा व अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

## आमदार निधीमध्ये वाढ करण्याबाबत

**श्री. गिरीश बापट :** अध्यक्ष महोदय, आमदारांना मिळणाऱ्या स्थानिक विकास निधीमध्ये माननीय वित्तमंत्री महोदयांनी ५० लाख रुपयांची वाढ केली आहे, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु हा निधी तीन कोटी रुपये करावयास पाहिजे, तो तीन कोटी रुपये करण्यात येईल काय ?

(दोन्ही बाजुकडील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात)

**अध्यक्ष :** सर्व सन्माननीय सदस्यांना उभे राहून अशा प्रकारे बोलता येणार नाही. मी कोणत्याही दोन सन्माननीय सदस्यांना बोलण्यास संधी देतो. कृपा करून सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे. सन्माननीय सदस्य श्री. बाबा सिद्दिकी, सन्माननीय सदस्य श्री. अबू आझमी आपण जागेवर बसा. सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांना मी सर्वांच्यावतीने बोलण्यास संधी देतो.

**श्री. शशिकांत शिंदे :** अध्यक्ष महोदय, सभागृहात अर्थ मंत्री महोदयांनी फार चांगले उत्तर दिले आहे. सभागृहातील वातावरण अत्यंत चांगले झाले आहे. सभागृहाबाहेर व सभागृहात जे वातावरण बिघडले होते, ते वित्त मंत्री महोदयांच्या भाषणामुळे चांगले झाले आहे त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. अर्थ मंत्री महोदयांकडे मी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्यावतीने विनंती करतो की, खासदार-निधी पाच कोटी रुपये करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे आमदार निधी तीन कोटी रुपये करण्यात यावा. तसेच डोंगरी भागासाठी विकास निधीमध्ये वाढ करण्यात यावी. आता अनेक बाबींवरील खर्चामध्ये वाढ झालेली आहे, महागाई वाढलेली आहे. ५० लाख रुपये वित्त मंत्री महोदयांनी वाढवून दिले आहेत, आणखी ५० लाख रुपये वाढवून द्यावेत अशी मी त्यांना विनंती करतो. आता रामराज्य आले आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे आपण मांडलेला मुद्दा वित्त मंत्री महोदयांनी ऐकला नसल्यामुळे मी सन्माननीय सदस्य श्री. गिरीश बापट यांना बोलण्याची संधी देत आहे.